

मनाल कासलीवाल याने खेलो इंडिया इंटर यूनिवर्सिटी स्पर्धेत रौप्य पदक पटकावल्याबद्दल सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य.



इचलकरंजी : खेलो इंडियात रौप्यपदक पटकावलेल्या कुडमनन कासलीवाल याचा सत्कार करताना डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# डी. के. ए. एस. सी.च्या खेळाडूचे खेलो इंडीयात यश

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : बेंगलोर येथे संपन्न झालेल्या 'खेलो इंडिया इन्टर युनिव्हॅर्सीटी' स्पर्धेत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाचा खेळाडू कुडमनन कासलीवाल याने शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करत रौप्यपदक पटकावले. या स्पर्धेत देशभरातून एकून २०० सहभाग नोंदवला होता. विद्यापीठांतील या खेळाडूचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार केला. त्यांना मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफकर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.

केसरी
9921600800
16-5-2022

सकाळ



इचलकरंजी : आदित्य सुतार याची रोलबॉल वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# रोलबॉल खेळाडू आदित्य सुतारचा सत्कार

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू आदित्य सुतार याची ६ व्या रोलबॉल वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याच्या भारतीय संघातील निवडीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वर्ल्डकप स्पर्धेत सहभागी होण्याचा शहराला दुसऱ्यांदा बहुमान मिळाला आहे. २१ एप्रिल ते २६ एप्रिल या कालावधीत पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात ही वर्ल्डकप स्पर्धा होणार आहे. वर्ल्डकप स्पर्धेमध्ये एकूण ३२ देशांचे संघ सहभागी होत आहेत. यजमानपद असणाऱ्या भारतीय संघात आदित्यची आघाडीचा खेळाडू म्हणून निवड झाली आहे. केनिया येथे झालेल्या दुसऱ्या वर्ल्डकप स्पर्धेत सहभागी होण्याची संधी शहराला मिळाली होती. त्यानंतर यंदा दुसरा खेळाडू सहभागी झाला आहे. आदित्यला जिमखाना प्रमुख मेजर मोहन वीरकर, प्रा मुजफ्फर लगीवाले, प्रा.प्रशांत कांबळे, प्रा.ए.बी.पाटील, वडील अरुण सुतार आदींचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Main
11/04/2023 Page No. 5




शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय कयाकिंग &  कनोईंग स्पर्धेत महाविद्यालयचे विजयी खेळाडू



शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले खेळाडू




इचलकरंजी : तायक्वांदो स्पर्धेत द्वितीय आलेली अनुराधा शेलार. शेजारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदी.

## अनुराधा शेलारची निवड

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू अनुराधा शेलार हिने शिवाजी विद्यापीठ विभागीय तायक्वांदो स्पर्धेत यश मिळविले. ४६ ते ४९ वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करीत तिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तिची सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते तिचा सत्कार केला. तिला प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.



## डी. के. ए. एस.सी. महाविद्यालयाचे तायक्वाँदो स्पर्धेत यश

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या महाविद्यालयाची खेळाडू अनुराधा शेलार (बी. कॉम. तृतीय) हिने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय तायक्वाँदो स्पर्धेत ४६ ते ४९ या वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला व सातारा येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली.

अनुराधाचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. तिला प्रा. मेजर वीरकर, प्रा. मुझफ्फर लागीवाले व जयकुमार कारके यांचे मार्गदर्शन लाभले.





सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# ‘डीकेएएससी’च्या खेळाडूंचे यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवले. संतोषी फातले हिने ६४ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. तिची गुंटूर (आंध्रप्रदेश) होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच तलवारबाजी स्पर्धेत प्रणव रावळ यांनी उत्कृष्ट कामगिरी करत कास्यपदक पटकावले. त्याची अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Ichalkaranji-Today
30/12/2021 Page No. 4





इचलकरंजी : विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेतील डीकेएएससी महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## 'डीकेएएससी'चे ॲथलेटिक्समध्ये यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले. स्फूर्ती माने हिने उंच उडीत १.५५ मीटर उडी मारून सुवर्णपदक तर अनिकेत माने याने १.९५ मीटर उडी मारून सुवर्णपदक पटकावले. श्रृती कांबळे हिने रौप्यपदक तसेच चंद्रभागा नेर्ले व योगेश गडकरी याने हॅमर थ्रो प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. ओंकार कुंभार याने ८०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्यपदक, गुड्डी सिंग हिने भालाफेकमध्ये कास्यपदक मिळवले. खेळाडूंची शिवाजी विद्यापीठाच्या पुढील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते खेळाडूंचा सत्कार केला. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.



## अवतीभवती



**इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदकप्राप्त डीकेएएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मेजर मोहन वीरकर.**

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केले. तीन विद्यार्थिनींनी वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. अलिशा नायकवडी हिने ६३-६६ किलो वजनी गटात, श्रृती लोहार हिने ६६ ते ७० किलो वजनी गट तर अंकिता पाटील हिने ५७ ते ६० किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. तीन विद्यार्थीनींची जालंधर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या तीन विद्यार्थीनी शिवाजी विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व करणार आहेत. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. यशस्वी खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.




रोईंग, कनोईंग & कयाकिंग स्पर्धेत महाविद्यालयाचे खेळाडू




चंद्रभागा केर्ले- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर झोनल हॅमर थ्रो स्पर्धेत सुवर्ण पदक



अनिकेत माने-शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर झोनल उंच उडी स्पर्धेत सुवर्ण पदक